FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

पुणे, मंगळवार, ११ जानेवारी २०२२ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

### महाराष्ट्र फाउंडेशनचे पुरस्कार जाहीर

## न्या. नरेंद्र चपळगावकर, प्रेमाताई पुरव यांना जीवनगौरव

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका या संस्थेतर्फे साहित्यातील योगदानासाठी दिला जाणारा दिलीप वि. चित्रे जीवनगौरव पुरस्कार यंदा निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांना तर समाजसेवेच्या क्षेत्रातील योगदानासाठीचा जीवनगौरव पुरस्कार अन्नपूर्णा परिवाराच्या प्रेमाताई पुरव यांना जाहीर झाला आहे.

साधना ट्रस्टचे विनोद शिरसाठ, मासूमचे रमेश अवस्थी आणि निवड समितीच्या सदस्य सुनीती सु. र. यांच्या उपस्थितीत २०२१ च्या पुरस्कारांची घोषणा सोमवारी करण्यात आली.



न्या. नरेंद्र चपळगावकर



प्रेमाताई पुरव

### कार्यक्रमाबाबत लवकरच निर्णय

करोनातील निर्बंधाचे स्वरूप विचारात घेऊन कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत निर्णय घेतला जाईल, असे विनोद शिरसाठ यांनी स्पष्ट केले. पुरस्काराची रक्कम सन्मानार्थींच्या बँक खात्यात तातडीने जमा केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे साहित्य आणि समाजसेवा क्षेत्रात यंदा ११ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार सिरसा, हरियाणा येथील अंशुल छत्रपती यांना जाहीर झाला आहे. छत्रपती यांनी बाबा राम रहीमच्या अत्याचार आणि खुनांना वाचा फोडली. डिजिटल पत्रकारिता क्षेत्रातील विशेष पुरस्कार राम जगताप यांना, वाङ्मयप्रकार पुरस्कार संतोष शिंत्रे यांना जाहीर झाला आहे. 'दगडीमक्ता' या कादंबरीचे लेखक रमेश अंधारे यांची ललित ग्रंथ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

नाट्य क्षेत्रातील नवोदित व्यक्तीला दिल्या जाणाऱ्या रा. शं. दातार नाट्य पुरस्काराने यंदा मुक्ता बाम यांना, तर डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांना त्यांच्या 'टिपंवणी' या आत्मकथनासाठी गौरवण्यात येणार आहे. सुरेश सावंत आणि सुनीता भोसले यांना कार्यकर्ता पुरस्कार, तर युवराज गटकळ यांना युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

Scanned with CamScanner